# लेखी परीक्षा

| | |
|---|---|
| **Test Booklet No/ प्रश्नपुस्तिका क्रमांक:** | **D** |
| **Roll Number :-** | |
| **Answer Sheet No:-** | |
| **Post Code : 51** | |
| **Total Question : 100** | **Total Marks : 200** |
| **Time : 1 Hour 30 Minutes** | |

.................................................................... ....................................................................

**Name and Signature of the invigilator** **Signature of the Candidate**

## IMPORTANT INSTRUCTIONS

## महत्वाच्या सूचना

| | |
|---|---|
| **1.** The test is of 2 hours duration and Question Booklet contains 100 questions. Each question carries 02 marks. For each correct response, the candidate will get 02 marks. | १. परिक्षेसाठी 2 तासांची वेळ आहे. प्रश्न पुस्तिकेमध्ये १०० प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नासाठी दोन गुण आहे. प्रत्येक अचूक उत्तरास दोन गुण मिळेल. |
| **2.** Use Blue /Black Ball point Pen only for writing particulars on this page or marking responses. | २.या पानावर तपशील लिहिण्यासाठी अथवा चिन्हांकित करण्यासाठी फक्त निळा किंवा काळा बॉलपाईंट पेन वापरा. |
| **3**. Rough work is to be done on the space provided for this purpose in the Questions booklet only. | ३. कच्चे काम करावयाचे असल्यास त्यासाठी याच प्रश्न पुस्तिकेमध्ये उपलब्ध केलेल्या स्वतंत्र जागेचा उपयोग करावा. |
| **4.** On completion of the test, the candidate must handover the Answer sheet to the Invigilator before leaving the Examination Hall. The candidates are allowed to take away this Questions Booklet with them after examination is over. | ४. परीक्षा पुर्ण झाल्यानंतर उमेदवाराने परिक्षाकेंद्र सोडण्यापुर्वी मुळ OMR पत्रिका समावेशकांकडे जमा करणे बंधनकारक आहे. मात्र OMR Sheet ( उमेदवाराची प्रत ) व प्रश्नपुस्तिका उमेदवारांना बरोबर घेऊन जाण्याची परवानगी आहे. |
| **5.** The candidates should ensure that Answer Sheet is not folded: Do not make any stray marks on the Answer Sheet. Do not write your Roll No. Anywhere else except in the specified space in the Questions Booklet and Answer Sheet. | ५.उमेदवाराने OMR Sheet च्या घडया घालू नयेत. OMR Sheet वर उत्तराचे गडद केलेले फक्त एकच वर्तुळ सोडून इतर कोणत्याही प्रकाराच्या खाणा-खुणा करु नयेत. प्रश्नपुस्तिका व OMR Sheet वरील निर्देशित केलेल्या ठिकाणीच आपला रोल नंबर लिहावा. |
| **6.** Each candidate must show his/her Admit Card/Hall Ticket to Invigilator whenever demanded. | ६. परीक्षा केंद्रावरील समावेशकांनी मागणी केल्यानंतर उमेदवारांनी प्रवेशप्रत्र दाखवावे.(Admit card /Hall Ticket) |
| **7.** No candidates should leave his/her seat without special permission of the Invigilator / Supervisor. | 7.परिक्षा केंद्रावरील समावेक्षक अथवा पर्यवेक्षक यांच्या विशेष परवानगी शिवाय कोणत्याही उमेदवारास आपली जागा अथवा परिक्षा कक्ष सोडता येणार नाही. |
| **8.** Use of Electronic / Manual Calculator or any type of Electronic gadgets is prohibited. | ८.इलेक्ट्रॉनिक /मॅन्युअल कॅल्क्युलेटर किंवा कोणत्याही प्रकाराच्या इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर करण्यास सक्त मनाई आहे. |
| **9.** The candidates are governed by all Rules and Regulations of the examination and Commissionerate of Health services with regard to their conduct in the Examination Hall.<br>All cases of unfair means will be dealt with the rules & regulations of this examination & CHS. | ९.उमेदवारांनी परिक्षेसंबंधी लागु असणा-या सर्व नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.आचारसंहितेचा भंग केल्यास परीक्षा नियमावली व आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या नियमानुसार कारवाई करण्यात येईल. |
| **10**. No part of Booklet and Answer sheet shall be detached under any circumstances till the end of examination. | १०.परिक्षा पुर्ण होईपर्यत कोणत्याही परिस्थितीत प्रश्नपत्रिका तसेच उत्तरपत्रिका यांची पाने वेगळी करु नयेत. |

1) पितळखोरा या प्राचिन लेणी ________ जिल्हयात आहेत.

A- बुलढाणा
B- हिंगोली
C- औरंगाबाद
D- नागपुर

2) महाराष्ट्रातील सर्वात मोठा अभयारण्य पेंच हे ________ जिल्हयात आहे.

A- कोल्हापुर
B- नागपुर
C- सोलापुर
D- पुणे

3) भारत इतिहास संशोधक मंडळ __________ येथे __________ यांनी स्थापन केली.

A- मुंबई, स्वांतत्र्यवीर सावरकर
B- नागपुर, विलियम जॉन्स
C- पुणे, वि.का.राजवाडे
D- औरंगाबार, दामोदर कोसंबी

4) 'The Rise of the Maratha Power' या पुस्तकाचे लेखक कोण आहे.

A- महात्मा ज्योतिराव फुले
B- न्यायमुर्ती महादेव गोविंद रानडे
C- ताराबाई शिंदे
D- गोविंद सखाराम सरदेसाई

5) छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई याचा _______ साली जागतीक वारसा स्थळामध्ये समावेश झाला आहे.

A- 2004
B- 2005
C- 2006
D- 2007

6) भारतीय जागतिक वारसा स्थळामध्ये पश्चिम घाटाचा समावेश _________ साली झाला आहे.

A- 2012
B- 2013
C- 2014
D- 2015

7) कराड व चिपळुण या दोन शहरांच्या मध्ये ________ घाट आहे.

A- एक दिवा घाट
B- कुंभार्ली घाट
C- आंबा घाट
D- फोंडा घाट

8) एकलहरे, नाशिक या ठिकाणी ________ विदयुत केंद्र आहे.

A- अणु
B- जल
C- वायु
D- औष्णिक

9) National Film Archive या संस्थेची मुख्य कचेरी __________ येथे आहे.

A- दिल्ली
B- पुणे
C- मुंबई
D- कलकत्ता

10) 'अंबोली' हे थंड हवेचे ठिकाण ________ जिल्हयात आहे.

A- सिंधुदुर्ग
B- रत्नागिरी
C- ठाणे
D- रायगड

11) खालील पैकी चुकीची_ जोडी शोधा.

A- कुतुब मिनार, मेहरवली
B- गोल घुमट, विजापूर
C- छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे टर्मिनस, दिल्ली
D- ताजमहाल, आग्रा

12) ________ यांचा जन्म 06, जानेवारी हा __________ म्हणुन पाळला जातो.

A- लोकमान्य टिळक, समता दिन
B- दादाभाई नौरोजी, कामगार दिन
C- बाळशास्त्री जांभेकर, पत्रकार दिन
D- या पैकी नाही.

13) दुरदर्शन हे ____________ माध्यम आहे.

A- दृक्
B- श्राव्य
C- दृक् श्राव्य
D- या पैकी नाही

14) All India Radio ची स्थापना ________ साली झाली.

A- 1936
B- 1938
C- 1940
D- 1942

15) महाराष्ट्राचे आदय किर्तनकार ________ यांना म्हणतात.

A- संत ज्ञानेश्वर
B- संत तुकाराम
C- संत एकनाथ
D- संत नामदेव

16) बाबुराव पेंटर यांनी ________ चित्रपट काढला.

A- सैरंध्री
B- पुंडलिक
C- राजा हरिश्चंद्र
D- बाजीराव मस्तानी

17) खालील पैकी चुकीची जोडी ओळखा.

A- रायगडाला जेव्हा जाग येते, वसंत कानेटकर
B- बटाट्याची चाळ, पु. ल. देशपांडे
C- साष्टांग नमस्कार, आचार्य अत्रे
D- एकच प्याला, अण्णासाहेब किर्लोस्कर

18) मेजर ध्यानचंद यांच्या नेतृत्वामध्ये एकुण 03 सुवर्ण पदके 'हॉकी ' या खेळा मध्ये खालील पैकी कोणत्या 03 सालांमध्ये जिंकली ?

A- 1928, 1932, 1936
B- 1929, 1930, 1931
C- 1932, 1933, 1934
D- या पैकी नाही.

19) Olympic स्पर्धांची परंपरा _________ मध्ये सुरु झाली.

A- ग्रीस
B- रोम
C- भारत
D- चीन

20) द्विभाषिक मुंबई राज्याची स्थापना _________ रोजी झाली.

A- 1 मे, 1956
B- 1 नोव्हेंबर, 1956
C- 15 ऑगस्ट, 1956
D- 26 जानेवारी, 1956

21) 1 ते 50 पर्यंतच्या सर्व सम संख्यांची बेरिज किती होते ?

A- 625
B- 600
C- 2550
D- 650

22) M हि एक विषम संख्या आहे तर एम च्या पुर्वीची आठवी सम संख्या कोणती ?

A- M+15
B- M-15
C- M-8,
D- M-16

23) एकक स्थानी एक अंक असलेल्या सर्व दोन अंकी मुळ संख्यांची बेरिज किती ?

A- 266
B- 306
C- 296
D- 215

24) 19 हा अंक रोमन संख्येत कसे लिहाल ?

A- XIX
B- XXX
C- XIV
D- XXI

25) 103 × 97 = _________ ?

A- 9999
B- 8991
C- 10991
D- 9991

26) एका पेटीत दोन डझन आंबे आहेत अशा 24 पेटीतील एकुण आंबे किती ?

A- 288
C- 329
B- 600
D- 576

27) 40 मिटर लांबीची पटटी 07 ठिकाणी सारख्या अंतरावर कापली तर प्रत्येक तुकडा किती मिटर लांबीचा होईल ?

A- 07 मिटर
C- 05 मिटर
B- 7. 1/7 मिटर
D- 08 मिटर

28) 999999÷99 = _________ ?

A- 111
C- 1,011
B- 10,011
D- 10,101

29) एका वर्तुळाची त्रिजा १०% ने वाढविल्यास क्षेत्र फळ ________ % ने वाढेल.

A-10%
C-21%
B-20%
D-11%

30) एका बागेत 1275 झाडे असुन त्यामध्ये 850 आंब्याची झाडे आहेत व 75 नांरळाची झाडे आहेत. उरलेली झाडे फणसाची आहेत. तरी फणसाची झाडे किती ?

A- 350
C- 450
B- 925
D- 250

31) 18×0×15÷05 = ____________ ?

A- 0
C- 180
B- 54
D- 270

32) 05 टेबलच्या किंमतीत 20 खुर्च्या येतात जर एका टेबलाची किंमत रु 1100/- असेल तर एका खुर्चीची किंमत किती ?

A- 275
C- 250
B- 175
D- 280

33) एक मोटार दिड तासात 90 कि.मी. अंतर जाते तर ती 04 तासात किती अंतर जाईल ?

A- 160 कि.मी.

C- 220 कि.मी.

B- 240 कि.मी.

D- 280 कि.मी.

34) खालील पैकी कोणत्या संख्येला 03 ने नि:शेष भाग जातो.

A- 2342

C- 5432

B- 3432

D- 8224

35) ज्या कोणाचे माप 90 पेक्षा कमी आणि 0 पेक्षा जास्त आहे त्यास _____म्हणतात.

A- लघुकोन

C- विशालकोन

B- काटकोन

D- या पैकी नाही

36) एक मिटर =__________मायक्रो मिटर

A- $10^6$

C- $10^8$

B- $10^7$

D- $10^9$

37) $\sqrt{0.0169}$ = _________?

A- 103

B- 0.013

C- 0.13

D- 0.0013

38) पुढील पैकी सर्वात मोठा अपुर्णांक कोणता ?

A- 16/15

B- 09/08

C- 13/15

D- 06/05

39) 85 चा वर्ग किती ?

A- 7225

C- 7210

B- 7220

D- 7224

40) $\sqrt{4624}$ = _________?

A- 78

C- 62

B- 68

D- 58

41) "गणूला सातारी पेढे खूप आवडतात", या वाक्यातील 'सातारी पेढे' शब्दाचा प्रकार कोणता?

A- नाम
C- विशेषण
B- क्रियाविशेषण
D- शब्दयोगी अव्यय

42) ‘कमलनेत्र’ या शब्दाचा समास ओळखा ?

A- द्विगू
C- अव्ययीभाव
B- बहुव्रीही
D- कर्मधारय

43) ‘जे चकाकते ते सारे सोने नसते’. हे कोणत्या प्रकारचे वाक्य आहे ?

A- केवलवाक्य
C- नकारार्थी वाक्य
B- संयुक्तवाक्य
D- मिश्र वाक्य

44) ‘अमर्याद’ या शब्दाचा समानार्थी शब्द सांगा.

A- गर्व
C- अगणित
B- डौल
D- पुष्कळ

45) ‘उपकार’ या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द ओळखा.

A- बदला
C- परोपकार
B- अपकार
D- मदत

46) पुढीलपैकी कोणत्या जोडशब्दात परस्परांचे विरुद्धार्थी शब्द आहेत?

A- गुणगान
C- जमाखर्च
B- सखेसोयरे
D- रितीरिवाज

47) ‘त्याचा डाव त्याच्यावरच उलटला’ या अधोरेखित 'डाव' या शब्दाच्या अर्थाचा पर्याय निवडा.

A- खेळ
C- बाजू
B- प्रयत्न
D- कपट

48) फारच दिवसांनी येणारी दुर्मिळ संधी म्हणजे

A- दुर्लभ
C- पर्वणी
B- पर्यवसान
D- दैविक

49) 'चर्पट पंजरी' या अलंकारी शब्दाचा अचूक अर्थ सांगा.

A- अर्थहीन पाठांतर
C- वायफळ बडबड
B- लांबत जाणारे काम
D- खरडपट्टी काढणे

50) गाईचे हंबरणे तसे वाघाचे

A- गर्जना

B- ओरड

C- चित्कार

D- डरकाळी

51) खालीलपैकी शुद्ध शब्द निवडा.

A- कनिष्ट

B- कनीष्ठ

C- कनिषट

D- कनिष्ठ

52) गाढवाचे पिल्लाला काय म्हणतात?

A- शिंगरू

B- शावक

C- पिल्लू

D- करडू

53) 'अंत' यास खालीलपैकी समानार्थी शब्द ओळखा

A- ओंजळ

B- मन

C- शेवट

D- लुप्त

54) "लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी, जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी". या ओळी कोणाच्या आहेत.

A- श्री. प्र. कृ. कोल्हटकर

B- सुरेश भट

C- माधव ज्युलियन

D- यापैकी नाही

55) विरुद्धार्थी शब्द सांगा कवडीचुंबक × ..........

A- दानशूर

B- निकस

C- बेकसूर

D- कौतुक

56) पूर्वी कधीही न घडलेला म्हणजे...

A- अभूतपूर्व

B- आगंतुक

C- अश्रूतपूर्व

D- अनाकलनीय

57) 'अंकित करणे' या वाक्यप्रचाराचा अर्थ सांगा.

A- पूर्ण ताब्यात घेणे

B- आपला संबंध काढून घेणे

C- लठ्ठ होणे

D- कामात कमजोर होणे

58) ठराविक क्रमाने आलेल्या अर्थपूर्ण अक्षर समूहाला काय म्हणतात ?

A- वाक्य

B- स्वराधी

C- शब्द

D- वर्ण

59) आपल्या तोंडावाटे निघणाऱ्या मूळ ध्वनींना काय म्हणतात ?

A- स्वर
B- वर्ण
C- व्यंजन
D- अक्षर

60) जमाव या शब्दातील 'ज' हा वर्ण कोणत्या प्रकारचा आहे ?

A- तालव्य
B- मुर्धन्य
C- दंततालव्य
D- कंठतालव्य

61) महाराष्ट्र राज्याचे सध्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री.

A- श्री हसन मुश्रीम
B- श्री राजेश टोपे
C- श्री राजेंद्र शिंगणे
D- श्री जयंत पाटील

62) महाराष्ट्र राज्याचे सध्याचे विधान परिषद सभापती कोण आहेत ?

A- डॉ. निलिमा गोरे
B- श्री नाना पटोले
C- श्री रामराजे नाईक निंबाळकर
D- श्री नरहरी झिरवळ

63) 2020 सालाचा लता मंगेशकर पुरस्कार कोणाला दिला ?

A- उषा मंगेशकर
B- उषा खान्ना
C- विजय पाटील
D- अरुण साधु

64) 2019 चे महाराष्ट्र केसरी कोण ?

A- बाबा रफिक शेख
B- अभिजीत कटके
C- विजय चौधरी
D- हर्षवर्धन सदगीर

65) महाराष्ट्र राज्यातील विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते कोण आहे ?

A- श्री. प्रवीण दरेकर
B- श्री. देवेंद्र फडणवीस
C- श्री. नाना पाटोले
D- श्री. नरहरी झिरवळ

66) 56 व्या महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कारामध्ये सर्वोत्कृष्ठ ठरलेला चित्रपट _________ होय.

A- भोंगा
B- एक सांगाचंय (Unsaid)
C- बंद बंदीशाळा
D- या पैकी नाही.

67) अखिल भारतीय मराठी साहित्य संम्मेलन 2020 मध्ये _________ येथे पार पडले.

A- उस्मानाबाद
B- सोलापुर
C- ठाणे
D- पुणे

68) माझे कुटुंब माझी जबाबदारी ही मोहिम महाराष्ट्र राज्याने _________ या रोगाच्या पार्श्वभुमीवर सुरु केली.

A- स्वाईन फ्लु
B- क्षय रोड
C- कुष्ठ रोग
D- COVID-19

69) भारताचे हॉकीचे जादुगार म्हणुन कोणाला ओळखले जाते.

A- मेजर ध्यानचंद
B- मिलका सिंग
C- धनराज पिल्ले
D- सानिया मिर्झा

70) 2020 चे साहित्य नोबेल पुरस्कार कोणाला देण्यात आला ?

A- पिटर हॅंड कि
B- कविचीती लुईस ग्लुक
C- या पैकी नाही
D- वोलगा टोकट झु

71) भारतातील पहिले आगळे वेगळे पुस्तकांचे गाव म्हणुन __________ यास ओळखले जाते.

A- भिलार
B- पाटण
C- निसरे
D- कराड

72) जिवाजी विद्यापिठ हे कोणत्या ठिकाणी आहे.

A- ग्वाल्हेर
B- कोलकाता
C- वाराणासी
D- दिल्ली.

73) 2019 चा गं.दि.मा. पुरस्कार कोणाला मिळाला ?

A- लता मंगेशकर
B- उषा मंगेशकर
C- सई परांजपे
D- जब्बार पटेल

74) सलग 3 वर्ष महाराष्ट्र केसरी जिंकणारा मल्ल कोण ?

A- अभिजीत कटके
B- बाबा रफिक शेख
C- विजय चौधरी
D- हर्षवर्धन सदगीर

75) मत द्यावयाचे नसेल तर खालील पैकी कोणता पर्याय निवडाल ?

A- NOTA
B- TOTA
C- MOTA
D- या पैकी नाही.

76) भारताचे 47 व्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश कोण आहेत ?

A- न्या. के.के. वेणुगोपाल
B- न्या. एच. एल. दत्तु
C- न्या. के. एम. नटराजन
D- न्या. शरद बोबडे.

77) भारताचे सध्याचे रेल्वे मंत्री कोण आहेत ?

A- श्री राजनाथ सिंग
B- श्री पियुष गोयल
C- श्री भरत शाह
D- श्री अश्विनी वैष्णव

78) महाराष्ट्र लोहमार्ग पोलीस दलाचे सध्याचे अपर पोलीस महासंचालक कोण आहेत ?

A- डॉ. प्रज्ञा सरवदे
B- श्री जयजीत सिंग
C- श्री कैसर खालिद
D- श्री संदीप बिष्णोई

79) महाराष्ट्रराज्याचे महसूल मंत्री कोण आहेत?

A- हसन मुश्रीफ
B- अशोक चव्हाण
C- बाळासाहेब थोरात
D- जयंत पाटील

80) महाराष्ट्रातील आदिवासी जिल्हा म्हणून _____ ओळखला जातो

A- कोल्हापूर
B- पालघर
C- सोलापुर
D- नंदुरबार

81) भारत `रुपया` तर जपान - ____________ ?

A- डॉलर
B- दिनार
C- येन
D- पैसा

82) विसंगत पर्याय ओळखा.

A- बसस्थानक
B- रेल्वे स्टेशन
C- विमानतळ
D- इग्लू

83) खालील अंक मालेतील `1` हा अकं डावी कडुन कोणत्या स्थानावर आहे. 4567943123024

A- 04
B- 06
C- 07
D- 08

84) 02,04,16 ______ ?

A- 08
B- 32
C- 256
D- 196

85) खालील पैकी मुळ संख्येचा गट कोणता ?

A- 1,3,5
B- 2,4,6
C- 5,7,9
D- 3,4,5

86) गौरीच्या वडीलांच्या एकुलत्या एका मुलाची मुलगी गौरीची कोण ?

A- बहिण
B- वहिणी
C- मुलगी
D- भाची

87) विश्वकप क्रिकेट कप स्पर्धेत 08 देशातील 08 संघांनी भाग घेतला होता. प्रत्येक संघ प्रत्येकाशी एक-एकदा सामना खेळेल, तर किती सामने होतील ?

A- 36
B- 28
C- 16
D- 08

88) रांगेत तुमचा क्रमांक दोन्ही बाजुने 11 असल्यास रांगेत एकुण लोक किती ?

A- 22
B- 23
C- 21
D- या पैकी काही नाही

89) दिशा ही सायंकाळी 06.00 वा. सुर्याकडे तोंड करुन उभी आहे, तरी तिच्या उजवी कडे कोणती दिशा असेल ?

A- पुर्व
B- पश्चिम
C- उत्तर
D- दक्षिण

90) जर 12+04 = 07
20+05 = 09
24+06 = 10
01+01 = ___ ?

A- 0
B- 1
C- 2
D- 4

91) क्रिकेटच्या एका संघातील 11 खेळाडुंनी प्रत्येकाने प्रत्येकाशी एक एकदा हस्तांदोलन केले तर एकुण हस्तांदोलने किती होतील ?

A- 66
B- 22
C- 23
D- 55

92) 100, 103, 109, 118, 130, 145, _______, 184

A- 168
B- 161
C- 169
D- 163

93) उत्तरेकडे बघत असणारा उत्तम 4 कि.मी. उजव्याहाताला चालला नंतर ‘M’ मि. आपल्या उजव्या हाताला चालला तेव्हा तो मुळ ठिकाणा पासुन सरळ रेषेत 05 मि. अंतरावर पोहचला. तर ‘M’ ची किंमत काय ?

A- 02 मि.

C- 03 मि.

B- 01 मि.

D- 04 मि.

94) खालील संख्येमाळेतील एक चुकीचे पद आहे ते शोधा.

07, 11, 17, 23, 35, 47

A- 35,

C- 11

B- 17

D- 23

95) दैनिक, साप्ताहिक, _______ ? मासिक, त्रैमासिक.


A- नियतकालिक,

C- वार्षिक

B- षण्मासिक,

D- पाक्षिक

96) खालील वेन आकृतीचा संबंध सोडवा.




A- आशिया, भारत, महाराष्ट्र,

C- अंटार्टीका, भारत, महाराष्ट्र,

B- युरोप, भारत, महाराष्ट्र

D- यापैकी नाही

97)



सोबतच्या आकृती मध्ये किती चौरस आहेत ?

A- 10

C- 14

B- 11

D- 15

98) जर ‘x’ हा ‘y’ च्या मुलाच्या मुलाचा भाऊ आहे. तर ‘x’ चे ‘y’ शी नाते काय ?

A- मुलगा,

C- भाचा

B- भाऊ

D- नातु

99) जानवी तिच्या आई पेक्षा 27 वर्षाने लहान आहे, त्या दोघींच्या वयाचे बेरीज 49 आहे. तर जानवीच्या आईचे वय किती ?

A- 11

B- 36

C- 34

D- 38

100) दिपा स्वातीच्या उजवी कडे बसली. प्रज्ञा स्वातीच्या डावी कडे बसली. दिपा व सिता यांच्या मध्ये गिता बसली, तर मधोमध कोण बसले आहे ?

A- स्वाती

B- गिता

C- सिता

D- दिपा

**"Rough Work/ कच्चे काम"**